झाडाझडती कादंबरीतील तत्वनिष्ठ व्यक्तिरेखा : खैरमोडे गुरूजी

प्रा.डॉ. पी.एम मदकुंटे
श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर जि.नांदेड

विश्वास पाटील हे समकालीन कादंबरीकार आहेत. साहित्यविश्वाला चांगले ज्ञात आहे. त्यांनी अनेक कलाकृती आकाराला आणली. यापैकी झाडाझडती या कलाकृतीतून धरणग्रस्तांच्या दयनीय स्थितीचे अत्यंत जिवंत असे चित्रण त्यांनी केले आहे.

धरणग्रस्तांनी आपल्यावर होणा—या अन्यायाविरूध्द दिलेल्या संघर्षाची कहाणी म्हणजे झाडाझडती. अशीच या कादंबरीतील संघर्ष करणारा तत्वनिष्ठ व्यक्तिरेखा म्हणजे खेरमोडे गुरूजी. आपल्या गावाबददल धरणग्रस्तांबददल त्यांच्या मनात खुप प्रेम आहे. अन्यायाविरूध्द पेटून उठणारी व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वात निस्वार्थपणा निर्भिडपणा आणि स्पष्टवक्तेपणा हा महत्वाचा भाग आहे. त्यांची वृत्ती चिंतनशील आहे. खैरमोडे गुरूजींनी या कादंबरीत धरणग्रस्तासाठी शासन दरबारी दिलेला खुप मोठा संघर्ष जिवनंतपणे साकार केले आहे. गाव हेच स्वत:चे कुटूंब आहे असे त्यांनी मानतात. गावातल्या प्रत्येक अडल्या—नडल्या माणसासाठी धावून जातात. कोणत्याही अधिका—यासमोर व पुढा—यासमोर सडेतोड बोलतात. सातत्याने धडपडणारे व्यक्तिमत्व म्हणून गुरूजीकडे पाहिले जाते. त्यांची वृत्ती कधीही हार न मानता लढत राहते. त्यांचा समग्र जीवनच संघर्षमय जीवन आहे. सुरूवातीला संघर्ष करतात ते धरण बांधु देऊ नये म्हणून, पण पराजीत होतात. धरण उभा राहतो. त्या परिसरातील सगळी गाव उठतात. त्यानंतर ते धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संघर्ष करतात. धरणग्रस्तांचे व्यवस्थितपणे पुनर्वसन व्हावा यासाठी त्यांनी पुढा—यांनी व अधिका—यांना विरोध करतात. अनेकांच्या भ्रष्ट प्रवृत्ती त्यांनी कौशल्याने उघडया पाडत असतात. त्या परिसरातील स्वार्थी आणि भ्रष्ट अधिका—यांना गुरूजी शत्रु आहे असे वाटतो. परंतु गावाच्या दृष्टीने मात्र त्यांनी आदरणी असतात. गुरूजी नव्हे धरणग्रस्तांचा एकमेव कैवारी आहे. असे धरणग्रस्तांना वाटतो.

गुरूजीचा बाहयांग व्यक्तिमत्वावरही या कादंबरीत प्रकाश टाकला आहे. सहा फुट उंच, सावळया रंगाचे, खादीचा पेहराव घालणारे खैरमोडे गुरूजी म्हण्जे एक चालती बोलती आग होय' हे विशेषण वापरलेले आहे. एक उददात, आदरणीय, तत्वनिष्ठ व संघर्षशील व्यक्तिमत्व या कांदबरीत आलेले आहे. खैरमोडे गुरूजी हे गावातल्या एका अस्पृश माणसाकडे तितक्या आदराने, श्रध्देने पाहण्याची वृत्ती आपल्या समाजात निरीक्षण करू लागलो तर अशी व्यक्ति वास्तवात आढळणार नाही. या कादंबरीत कुठेही खैरमोडे गुरूजीकडे निकृष्ट जातीमध्ये जन्माला आले म्हणून गावातल्या माणसांनी त्यांच्यकडे तुच्छतेने पाहिलय अस मात्र कुठेही दितन नाही. संपूर्ण गाव त्यांच्याकडे आदराने पाहतो. काही अधिकारी मात्र हरिजन म्हणून तुच्छतेने बोलण्याचा प्रयत्न केला आहे.

खैरमोडे गुरूजीवर अनेक संकट येतात. परंतु संकटांना, आरोपांना भिवून काम बंद करून आपल्या पुरते जगणे हे गुरूजीसाठी शक्य नाही. कारण संपूर्ण जांभळी गाव हेच त्यांनी स्वत:चे कुटूंब मानले आहे. ' नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही ' म्हणून ते धरणाला विरोध करतात. धरणग्रस्तांच्या प्रश्नां संदर्भात सभा होतात. काही पुढारी तिथे येतात. तेव्हा त्या सभेवरही खैरमोडे गुरूजी आपल्या भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडतात. ते पुढारी सहानुभुतीने बोलू लागले तर खैरमोडे गुरूजी म्हणतात, '' आम्हाला भूतदया नको हक्क हवं आहे '' अनेकांचा रागही सहन

करतात. ते स्पष्टपणे पुढा—यांना सांगतात, कशाला उठवायची ही गाव ? छोटी छोटी तीन धरण बांधा. पुनर्वसन नको, असे मुददे मांडतो. पण या मुददयाची दखल घेतली जात नाही. धरण होतो. त्या काळात लंगडा गोविंदा मरतो. ते पुढारी लोक श्रध्दांजली अर्पण करतात. त्यावर गुरूजी म्हणतात, '' श्रध्दांजल्या, आरत्या अर्पण करून चालत नाही. आमचं कुटूंब मसणओटा झाला आहे.''

खासदार शिंगाडे हे धरणाचे पुढारी आहेत. '' गुरूजी तुम्ही उगाच लोकांचे मन भडकू नका तुम्ही मला सांगा एवढे मोठे धरण बलिदान झाल्याशिवाय होईल का? '' असे पुढारी म्हणतात. त्यावर गुरूजी म्हणतात '' जे सुळावर चढतात त्यांच्या चिल्ल्या—पिल्ल्याकडे बघता का? त्यांच्या पोराला हैबतीला तरी नोकरी देणार का? ज्याच जळतं त्यालाच कळतं साहेब. व्हा तुम्ही एकदा धरणग्रस्त मग माय—बाप आठवतो.'' अशा रितीने धरणग्रस्तांवर झालेला अन्याय स्पष्टपणे मांडतात.

गुरूजींच्या व्यक्तिमत्वात अनेक गोष्टींचा मिश्रण आहे. ' भुतदया नको आम्हाला हक्क हवा आहे' असे म्हणतात. तेथे डॉ. आंबेडकरानी सांगितलेले स्वाभिमान जाणवतो. परंतु संपूर्ण व्यक्तिमत्व बाबासाहेबांच्या विचारसरणीशी जुळणारी आहे असे वाटत नाही. त्यांनी परंपरागत गोष्टी सोडल्या नाहीत. खंडेरायाला उदबत्ती लावतात, चांगल्या कामाला जाताना बाबासाहेबांच्या फोटोला नमस्कार करतात व महादेवालाही ते म्हणतात '' मला या कामात यश दे.''

या ठिकाणी त्यांचे व्यक्तिमत्व श्रध्दाळू असल्याचे दिसते. परंतु या सोबतच तत्वनिष्ठपणा, मूल्यांचा जतन करणारा, भ्रष्ट प्रवृत्तीचा स्वत:च्या अंगाला स्पर्श होऊ देत नाहीत.

गावात नुकसान भरपाई वाटण्यासाठी अधिकारी येतात. हे उगाच अडवणूक करतात. त्या विरूध्द बोलतात. नुकसान भरपाई नियमानुसार वाटल्या जावा असे गुरूजीला वाटते. गुरूजीच्या भूमिकेमुळे अनेक पुढा—यांचे हितसंबंध धोक्यात येतात. म्हणून त्यांना शत्रू मानतात. मास्तर भांडखोर, होकट, तिरसट स्वभावाचा आहे. याची नांगी मोडलीच पाहिजे असे म्हणतात. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला जातो.

स्वार्थी म्हणून एखादा माणूस किती टोकाला जातो याचे उदाहरण म्हणजे दत्तू याने जिवंत असलेल्या सावत्र आईच्या मृत्यूचा दाखला तयार करून घेतो. जो ग्रामसेवक व तलाठी हे दाखला देतो तो किती भ्रष्ट? अशा ग्रामसेवकाला गुरूजी धारेवर धरतात. ''लकडी शिवाय मकडी वठणीवर येत नाही'' म्हणतात.

गुरूजी जाती—पातीला विरोध करतात. कसली जात आणि पात घेउन बसलात? उदया गावात पाणी शिरल्यावर कळतं कारूबी गेलं आणि नारूबी गेलं, आता दोनच जाती. एक राबून घेणा—याची अन दुसरी राबणारी. आपण सारे औद्योगिक दलित भ्रष्ट प्रवृत्तीच्या कारवाया सातत्याने चाललेल्या असतात. गुरूजीवर या नात्या कारणाने आरोप केला जातो. त्या परिसरातले खा.शिंगाडे पुनर्वसनाचा दिलेला शब्द पाळत नाही. तेव्हा गुरूजीला संताप येतो. ' आम्ही रक्त ओतू पण न्याय मिळवू, लेचे पेचे नाही. ''गावातली पोरं गुरूजीवर आरोप करतात तेव्हा त्यांना दु:ख होतो. पण आपले काम सोडत नाहीत.

सहेब आम्हा धरणग्रस्तांच्या डोईला केस कमी आणि अडचणी जास्त. पोलिसस्टेशन दाद घेत नाही. मद्यापासून आम्ही जगायचं कुठ बोलत होतोत आणि आता मरायचे बोला? स्मशानभुमी कुठं आहे? असे गुरूजी प्रभावीपणाने प्रत्येक बैठकीमध्ये धरणग्रस्तांचे प्रश्न मांडतात.

या कादंबरीत गुरूजींची सामाजिक भाव व्यक्त होतो. त्या बरोबरच वैयक्तीक भावही आलेला आहे. व्यक्तिगत भावविश्व मुलगी आहे.तिचे नाव शेवंता. तिच्या लग्नाचा वेळ येतो.

आपली मोरणी परक्याच्या घरी जाणार. या कल्पनेने गुरूजी कासावीस होतात. घरच्या या नाजूक जाळयात जखडल्याचा बघून हिरा मास्तरणीला हसु फुटायचा. गुरूजी जेव्हा गावात होते तेव्हा शेवंतीचे वाटेल ते लाड पुरवले, पण गाव उठला तेव्हा मात्र अडचणी येऊ लागल्या. आपल्या मुलीचा संसार त्यांना दिसत नाही. पराकोटीचा दु:ख सोसावा लागतो.

धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याची धडपड. त्यांची भूमिका छोटी—छोटी धरण बांधावा व विकास करावा. आपल्याकडील नियोजनाबददल बोलतात, '' आपलं नियोजन काशीच्या न्हाव्यासारखा आहे.'' अशी प्रतिमा देतात. तुकडीकरणा विरूध्द बोलतात. कुत्री—मांजरी सुध्दा कळपात राहतात. तुम्ही आम्हाला वेगळे करता? अशा तत्वनिष्ठ भूमिकेमुळे त्यांना लाखो रूपयांची लाच देण्याचा प्रयत्न केला जातो. पण ते स्विकारत नाहीत. या मास्तरचं तोंड बंद केला पाहिजे. अशा प्रकारचा प्रयत्न केला जातो. धरणग्रस्तांसाठी काम करत राहणा—या खैरमोडे गुरूजीचे व्यक्तिगत जीवनातही दु:खच आहे. जावई त्यांना चांगला मिळाला नाही. त्याने शेवंतीला नांदवून घेत नाही. इथली स्वार्थी मंडळी जावयाचे कान भरतात. यावेळी शेवंतीचा सासरा येतो, संवाद होतो. सासरा म्हणतो, '' पैका घ्यायचं अन गबबसायचं. दहा—पंधरा—पंचवीस हजार मागा.'' असे बोलणे गुरूजीला सहन झाले नाही. '' माझ्या पायातलं पायतण तुमच्या डोक्यावर पडण्याआधी उठा'' असे गुरूजी बोलल्यावर त्याचा चेहरा काळाठिक्क होतो. म्हातारपणी माझ्या पिकल्या केसाला बटटा नको. गुरूजीची तत्वनिष्ठा ठळकपणे प्रकट होते. धरणग्रस्त मुलांना नोकरी लावण्यासाठी अत्यंत धडपड करतात. ज्यांना खरं गरज आहे त्यांना नोकरीला लावतात. पण खैरापुरचे काही पोरं वशील्याने नोकरीला लागतात. यामुळे गुरूजीला चिड येतो. हे पोरं गुरूजी एकटे जाताना मारहाण करतात. तरीही गुरूजी म्हणतात,'' गांधीबाबा सारखा अहिंसक लढा दयायचा.'' शेवंता ही त्यांची लाडकी लेक. खैरापुरचे काही गुंड तरूण शेवंतावर बलात्कार करतात. ही गोष्ट कळाल्यावर गुरूजीला प्रचंड संताप येतो. हातात कु—हाड घेतात म्हणतात,'' बघू '' हीरा मास्तरीण त्यांना गप्प बसवतात. गुरूजींना शांतच बसाव लागतो. खैरमोडे गुरूजी आता बरेच थकलेले आहेत. खैरमोडे गुरूजी म्हणजे धरणाला विरोध करणारा व धरणाला विरोध म्हणजे विकासाला विरोध असे पेपरात छापून येते. हा म्हातारा ग्रमस्थांची फसवणूक करतो. अशी मुलाखत बाबुलाल भांग्रे हा नेता दिला. त्यांच्या संघटनेला भरपूर पैसा मिळतो. हे ऐकून गुरूजीला फार संताप येतो. गुरूजी म्हणतात,'' हा बाबू भांग्रे कोण? फक्त सभा संमेलनात हिंडतो. उत्तर दयायला हिंमत नसेल की असे बिनबुडाचे आरोप करतो.''

मसणमाळ, झांझरवाडी, इर्लेवाडी, व फणसवाडी ही सारी गाव पेटून उठले असते तरी सत्ताधारींना कळले असते. संघर्ष शिवाय काहीही मिळत नाही. गुरूजी थकलेले असताना एके दिवशी शाळेत जातात. पोरांना सांगतात,'' आपल्या सारख्या बुडत्यांना शिक्षणाच्या काडीचा आधार. तुम्ही लई शिका. शाळेत मुलांना एक कविता शिकवतात. डबडबलेल्या डोळयांनी शाळेचा निरोप घेतात. पाउस खुप पडतो. हिरामस्तरीण पहाटे उठते. बाहेर पाहिले तर जो—यांत पाउस चुल पेटलेलं भांडयाचा आवाज झालं '' आव चाय पाहिजे नाही?'' म्हणत मास्तरीण अंथरूणाकडे जाते. थंडगोळा दिसतो. हिरा मोठयाने बोंब मारते, रडते. गावठाण्याचे म्हाकु, हैबती, रडतात. गावठाण्याचा राजा, पालनहार, मायबाप, निघून गेलेला असतो. सा—या जांभळीचा कंबर मोडून गेलेला असतो. दिनवाणं होतो.

खैरमोडे गुरूजी धरणग्रस्तांसाठी जीवाचे रान करतात, पण त्यांच्या अंत्यविधीसाठी सुध्दा त्यांना हक्काची जागा मिळत नाही. ही शोकांतिका वास्तवादी आहे.

गुरूजीवर कितीही संकट आणि दु:ख आले तरीही ते डगमगलेले नाहीत. धीराने प्रत्येक गोष्टीला तोंड दिले आहेत. कोणत्याही अमिषाला ते बळी पडले नाहीत. त्यांची तत्वनिष्ठा सोडले नाहीत. धरणग्रस्तांचे प्रश्न सोडण्यासाठी सातत्याने संघर्ष करत राहीले. गुरूजीची व्यक्तिरेखा संपुर्ण कादंबरीत धरणग्रस्तांना न्याय मिळावा आणि ते न्याय गैरमार्गाने मिळू नये. यासाठी धडपड करताना दिसतो. लेखक विश्वास पाटील यांनी ' खैरमोडे गुरूजी ही व्यक्तिरेखा धरणग्रस्तांनाच्यासाठी शासनाशी संघर्ष करणारी आणि तत्व न सोडणारी महत्वाची व्यक्तिरेखा चित्रित केले आहे.

संदर्भ :

१. झाडाझडती — विश्वास पाटील, राजहंस प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९१